# पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे

नविन मध्यवर्ती इमारत, ३ रा मजला, पुणे

Ph No- ०२०- २६१२६६२८/२६१२३९८५ Fax- ०२०- २६१२७००४

Gmail- dirmktms@gmail.com Website- mahapanan.maharashtra.gov.in


---

जा.क्र. पणन-५/कृउबास/मानधन/ भत्ते/ सन २०१९ /४६८/ दिनांक: - ९ /०२/२०१९

**-: परिपत्रक :-**

**वाचावे:-** १) शासन पत्र क्रमांक कृबास ०४१३/प्र.क्र.२०९/११-स ,दि.३० मे २०१३.

२) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन ) अधिनियम १९६३ व नियम १९६७ मधील तरतूदी .

३) महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे दिनांक २.११.२०१८ व दि. २८.१.२०१९ चे पत्र.

४) महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांचे दिनांक १०.१.२०१९ चे पत्र.

**विषय :- राज्यातील कृषि उत्पन्न बाजार सभापती /सदस्यांना मानधन व इतर भत्ते मंजूर करणेबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत शासन पत्र क्र.कृबास-२००८/प्र.क्र.३६६/११-स,मंत्रालय,मुंबई-३२दिनांक ०५.०८.२००८ अन्वये राज्यातील बाजार समित्यांचे पदाधिकारी यांचे मानधन, प्रवासभत्ता व रोज भत्ता मध्ये वाढ केलेली होती. वास्तविक इतर संस्थाचा विचार करता त्यांचे सदस्यांचे मानधन व भत्यामध्ये भरीत वाढी होत आहेत. परंतु गेल्या पाच वर्षापासून बाजार समिती पदाधिका-यांचे भत्यामध्ये वाढ करण्यात आलेली नाही. दिवसेंदिवस वाढत असलेली महागाई, प्रवासभाडे , पेट्रोल व डिझेलचे वाढत असलेले दर इत्यादी बाबींचा विचार करता ,राज्यातील बाजार समित्यांचे पदाधिकारी यांचे मानधन, प्रवासभत्ता व रोज भत्ता मध्ये वाढ होणे गरजेचे झाले आहे. शासनाने दि.३०.५.२०१३ चे पत्रान्वये याबाबतचे अधिकार महाराष्ट्र कृषी पणन (विकास व विनियमन ) अधिनियम १९६३ चे कलम २१ (अ) अन्वये पणन संचालनालयासअसल्याने या अनुषंगाने निर्णय घेण्याबाबत कळविलेले आहे.

महाराष्ट्र कृषी पणन (विकास व विनियमन ) अधिनियम १९६३ चे कलम २१ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार बाजार समित्यांचे पदाधिकारी यांचे मानधन, प्रवासभत्ता व रोज भत्ता इत्यादीचे खालीलप्रमाणे सुधारीत दर मंजूर करण्यात येत आहेत.

१) सभापती/ उपसभापती मानधनाचे दर :-

| वर्ग | उत्पन्नाची मर्यादा | दरमहा मानधनाचे दर | |
|---|---|---|---|
| | | सभापती | उपसभापती |
| अ | रु,१०० लाखचे वर | रु,१०,००० | ५,००० |
| ब | रु.५० लाखाचे वर व रु, १०० लाखापर्यत | रु,७,५०० | ३,७५० |
| क | रु, २५ लाखाचे वर व रु.५० लाखापर्यत | रु,५,००० | २,५०० |
| ड | रु, २५ लाखापेक्षा कमी | रु,२,५०० | १,२५० |

२) सदस्य दैनिक भत्ता :--

| वर्ग | क्षेत्र | दर |
|---|---|---|
| अ | ग्रामपंचायत क्षेत्र | ३०० |
| ब | नगर परिषद क्षेत्र | ४५० |
| क | महानगरपालिका क्षेत्र | ६०० |
| ड | राज्याबाहेरील क्षेत्र | ७५० |

landge

(कृ.मा.प.)

३) सभा बैठक भत्ता दर:-

| वर्ग | उत्पन्नाची मर्यादा | दर |
|---|---|---|
| अ | रु,१०० लाखचे वर | ३७५ |
| ब | रु.५० लाखाचे वर व रु, १०० लाखापर्यत | ३५० |
| क | रु, २५ लाखाचे वर व रु.५० लाखापर्यत | ३२५ |
| ड | रु, २५ लाखापेक्षा कमी | ३०० |

वरील सुधारीत दरास खालील अटीच्या अधीन राहून या कार्यालयाची मान्यता देण्यात येत आहे.

१) आर्थिकदृष्टया दुर्बल समित्यांनी त्यांचे आर्थिक नियोजन करुन बाजार समित्यांचे उत्पन्न व खर्च यांचा ताळमेळ घालून खर्चावर नियंत्रण ठेवावे.

२) आर्थिकदृष्टया सक्षम नसलेल्या समित्यांना सुधारीत दर देणे शक्य/ परवडणारे नसल्यास, त्या समित्यांनी शासनाचे दिनांक *०५.०८.२००८ च्या पत्रात नमूद केलेल्या दरानुसार भत्ते अदा करावेत.*

३) एकाच दिवशी एकापेक्षा जास्त सभा असल्यास त्या सदस्यास एकाचा बैठकीचा दैनिक भत्ता व बैठक भत्ता अनुज्ञेय राहील.

४) याबाबत वाढीव खर्चासाठी शासन कोणतेही वाटा/आर्थिक भार उचलणार नाही वा कोणतीही आर्थिक मदत मिळणार नाही.

( दिपक तावरे )
भा.प्र.से.
पणन संचालक
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,
सभापती / सचिव,
कृषि उत्पन्न बजार समिती, ----------- (सर्व)

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना:-
१) महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे-३७.
२)विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व )
४) महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्या,पुणे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर:- मा. प्रधान सचिव, (पणन ) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई -३२